33

वाचले :- १) शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. प्राधिकरण- २२००४/प्र.क्र.३३७/कामगार-७, दि.१ जुलै, २००४.

२) इकडील आदेश क्र.पसह/कावि/१९०४/२०१०, दि. १/१०/२०१०

३) इकडील सुधारीत आदेश क्रं. सशा/पसह/कावि/२२८४/२०११ दि.१५/१५/११.

४) मा. पालकमंत्री यांचेकडील पत्र क्रं. जा.क्रं.पालकमंत्री/अन्न व ना.पु. आणि ग्रा.सं.अ.औ.प्र.व सं.कार्य /व्ही.आय.पी./१३२९ दिनांक- १७/०८/२०१५.

---

जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे
सर्वसाधारण शाखा,पसह संकलन
क्र.सशा/पसह/कावि/१६१७/२०१५
दि. १४/०९/२०१५

**विषय :- असंघटित कामगारांसाठी जिल्हास्तरीय कार्यकारी समिती**

**सुधारीत आदेश**

उक्त नमुद शासन निर्णयानुसार व आदेशानुसार सदर समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीतील अशासकिय सदस्यांच्या नियुक्तीबाबत मा. पालकमंत्री पुणे जिल्हा यांचेकडून शिफारस प्राप्त झालेने सदरचे अशासकिय सदस्यांचा समावेश करुन खालीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **समितीची रचना व नावे** | **पत्ता** | **पद** |
|---|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | जिल्हा परिषद, पुणे | सह अध्यक्ष |
| ३ | कामगार उपायुक्त | कामगार उपआयुक्त कार्यालय, बंगला नं.५, शिवाजीनगर, पुणे मुंबई रोड, पुणे ४११ ००५. | कार्याध्यक्ष |
| ४ | **कामगार संघटनांचे प्रतिनिधी** | | |
| | १. श्री. दिलिप नामदेवराव पासलकर | हरिओम बंगला, शंकरराव मोरे सोसा. विठ्ठल मंदिराशेजारी, कर्वेनगर,पुणे. मो.नं.९८५०९१०३१५ | सदस्य |
| | २. श्री. जयंत मारुती शिंदे | जी-१ एव्हिड को. ऑ. सोसा. निळकंठ मंदीराजवळ, आकुर्डी, पुणे-३५. मो.नं.७२७६८२९७७७ | सदस्य |
| ५ | निवासी उपजिल्हाधिकारी, पुणे (जिल्हाधिकारी कार्यालयाचा प्रतिनीधी) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | **मोठया प्रमाणात असंघटित काम असलेल्या उद्योगातील कामगार प्रतिनिधी** | | |
| | १. श्री. सुहास सुदाम दांगट | स.नं.८५, जयहिंद चौक, कामठेवस्ती, एन.डी.ए. रोड, शिवणे, पुणे ४११ ०२३. मो. नं.९७६७७२४८४८ | सदस्य |
| | २. श्री. अभय दशरथ वाघमारे | ३९५ नाना पेठ, पुणे ४११ ००२. मो. नं.९८२२६८३५११ | सदस्य |
| | ३. श्री. गणेश वसंतराव प-हाड | मु. कडाची वाडी, गणेशनगर, चाकण, ता.खेड, जि. पुणे मो. नं. ९८५००८५०६१ | सदस्य |
| | ४.श्री. वसंत सिताराम बनसोड | लोकशाहिर अण्णाभाऊ वसाहत, अरण्येश्वर, पुणे ४११ ००९ | सदस्य |
| ७ | विशेष समाज कल्याण अधिकारी, | समाज कल्याण कार्यालय, पीएमटी बिल्डींग, पुणे | सदस्य |
| ८ | उपसंचालक आरोग्य, पुणे | उपसंचालक आरोग्य विभाग, नविन प्रशासकिय इमारत, पुणे | सदस्य |
| ९ | उपसंचालक शिक्षण | उपसंचालक, शिक्षण,मध्यवर्ती इमारत, पुणे | सदस्य |
| १० | जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | जिल्हा महिला व बाल कल्याण कार्यालय, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे | सदस्य |
| ११ | जिल्हा व्यवस्थापक, भारतीय आयुर्विमा कंपनी | जिल्हा व्यवस्थापक, भारतीय आयुर्विमा कंपनी, जिल्हा कार्यालय पुणे | सदस्य |
| १२ | असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांशी संबंधीत शासकीय विभागाच्या कामगार आयुक्त कार्यालयातील जिल्हास्तरीय अधिकारी | कामगार आयुक्त कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ५. | सदस्य |
| १३ | कामगार उपायुक्त, पुणे | कामगार उपायुक्त कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ | सदस्य सचिव |

**(सौरभ राव)**
**जिल्हाधिकारी पुणे**

**प्रत** :- १) सदस्य सचिव तथा कामगार उपायुक्त,तथा सदस्य सचिव, पुणे

२/-  यांना कळविणेत येते की, उपरोक्तप्रमाणे गठीत करणेत आलेल्या समितीच्या बैठका व त्यासंबंधीची कार्यवाही ही प्रस्तुतचे समितीसंबंधीचे शासन निर्णयाप्रमाणे करणेची दक्षता घेणेत यावी.

तसेच प्रस्तुतचे आदेशाच्या प्रति यासोबत जोडणेत आलेल्या आहेत. त्यानुसार आदेशाची प्रत संबंधीतास बजावून त्याबाबतचा पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करणेत यावा.

२) स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, पालकमंत्री पुणे जिल्हा, मंत्रालय,मुंबई-३२.
२/-  सदर समिती या आदेशान्वये गठीत केली बाबत मा.मंत्री महोदय यांचे निदर्शनास आणून देणेस विनंती आहे.

३) मा. उप सचिव, (कामगार) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
२/-  आपलेकडील शासन निर्णय क्रमांक प्राधिकरण- २२००४/प्र.क्र.३३७/कामगार-७, दि.१ जुलै, २००४ नुसार माहितीसाठी सविनय सादर.

४) मा.विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे यांस माहितीस्तव सविनय सादर.

**जिल्हाधिकारी पुणे करीता**

Renew Samittes

**सामाजिक न्यायाचे पुढचे पाऊल**
**असंघटित कामगारांचे जिल्हास्तरीय**
**कार्यकारी समित्यांची स्थापना करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. प्राधिकरण- २२००४/प्र.क्र.३३७/कामगार-७,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- १ जुलै, २००४

**प्रस्तावना :-**

राज्यामध्ये असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असून या क्षेत्रातील कामगारांचा दारिद्रय रेषेखालील व्यक्तींकरिता असलेल्या कल्याणकारी योजनांमध्ये समावेश नसल्यामुळे, तसेच इतर समन्वय नसल्यामुळे आणि त्यांच्याबद्दलची वस्तुनिष्ठ सांख्यिकी माहिती नसल्याने, व या कामगारांसाठी योजना आखून त्या अमलात आणणे शक्य झालेले नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता शासनाने सामाजिक न्यायाचे पुढचे पाऊल म्हणून असंघटित कामगारांसाठीचे एक स्वतंत्र उच्चाधिकार प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. प्राधिकरणाचे काम व छोटया योजना परिणामकारकरित्या पार पाडण्यासाठी व योजनांची अंमलबजावणी वास्तवात येण्यासाठी असणाऱ्या प्रक्रिया वेळेत पार पाडण्यासाठी शिस्तबध्द यंत्रणा आवश्यक असल्याने जिल्हास्तरावर कार्यकारी समित्या स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-**

असंघटित कामगारांसाठी स्थापन करण्यात आलेल्या राज्यस्तरावरील प्राधिकरणास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदतपूर्ण ठरावे म्हणून राज्यातील सर्व जिल्हयांसाठी प्रत्येकी एक या प्रमाणे जिल्हास्तरावर असंघटित कामगारांसाठी कार्यकारी समित्या स्थापन करण्यात याव्यात. या कार्यकारी समित्यांची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| जिल्हा अधिकारी | अध्यक्ष |
| मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सह अध्यक्ष |
| संबधित जिल्हयातील कामगार विभागाचा कार्यालय प्रमुख | कार्याध्यक्ष |
| कामगार संघटनांचे २ प्रतिनिधी | सदस्य |
| जिल्हाधिकारी कार्यालयाचा प्रतिनिधी | सदस्य |
| मोठ्या प्रमाणात असंघटित काम असलेल्या उद्योगातील ४ कामगार प्रतिनिधी | सदस्य |
| सामाजिक न्याय विभागाचा प्रतिनिधी (Social Welfare) | सदस्य |
| सार्वजनिक आरोग्य विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| शिक्षण संचालनालयाचा प्रतिनिधी | सदस्य |
| महिला व बाल विकास विभागाचा प्रतिनिधी | सदस्य |
| संबधित जिल्हयातील भारतीय आयुर्विमा महामंडळाचा प्रतिनिधी (LIC) | सदस्य |

कामगार आयुक्त

असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या प्रश्नांशी संबंधित शासकीय विभागाचा जिल्हास्तरीय अधिकारी — सदस्य

कामगार आयुक्त कार्यालयाचा जिल्हास्तरीय कार्यालयातील प्रतिनिधी — सदस्य सचिव

२. जिल्हा स्तरावरील कामगार विभागाच्या अखत्यारीतील कार्यालय प्रमुखाने कोणत्या सरकारी कामगार अधिकाऱ्यास कार्याध्यक्ष म्हणून नियुक्त करावा याचा निर्णय घ्यावा. तसेच त्याच कार्यालय प्रमुखाने सदस्य सचिव पदावर देखील त्याच कार्यालयातील व्यक्तींची नियुक्ती करावी.

३. या कार्यकारी समितीला त्यांच्या बैठकीमध्ये ज्या ज्या समस्यांवर चर्चा करावयाची असेल त्या त्या समस्यांसंबंधातील अधिकाऱ्यांना त्या त्या बैठकीस बोलाविण्याचे अधिकार देखील राहतील.

४. कामगार संघटनाच्या प्रतिनिधींची, तसेच कामगारांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर समितीच्या कार्याध्यक्ष व सदस्य सचिव हे जिल्हा स्तरीय कामकाजाचे अभिलेख ठेवणे, असंघटित कामगारांच्या प्रश्नासंबंधी पत्र व्यवहार करणे, कायदे व योजनांची अंमलबजावणी करणे, सर्वेक्षण, प्रसिध्दी, योजनांबाबतचे मार्गदर्शन इत्यादी कामे पार पडतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(बी.वि.प्रभु)
उप सचिव (कामगार)

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय (सह सचिव श्री. ओक)
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४) मा. राज्य मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
५) प्रधान सचिव (सामाजिक विकास समन्वय) यांचे स्वीय सहायक
६) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक
७) उप सचिव (श्रीम. प्रभु) यांचे स्वीय सहायक
८) सर्व विभागीय आयुक्त, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
९) सर्व जिल्हाधिकारी.
१०) कामगार आयुक्त, मुंबई.
११) सह कामगार आयुक्त, मुंबई
१२) अपर कामगार आयुक्त, मुंबई, पुणे, नागपूर
१३) उप कामगार आयुक्त ठाणे, नाशिक, औरंगाबाद
१४) कामगार विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय व क्षेत्रिय कार्यालये.
१५) मंत्रालयीन सर्व विभाग.
१६) कामगार विभागातील सर्व अधिकारी १७) निवड नस्ती. (का-७)